RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 102 : महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास : जात, वर्ग आणि लिंगभाव परिप्रेक्ष्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

100-A

# महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीतील केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांचे कार्य

डॉ. दिनकर रावजी मुरकुटे
रयत शिक्षण संस्थेचे,
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे- १७.
dinkar25773@gmail.com
Mobil.09325289131

विसाव्या शतकातील सर्व महत्त्वाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक घडामोडींच्या केंद्रभागी सत्यशोधक चळवळ होती. इ.स.१९३० साली देशातील राष्ट्रीय चळवळीचे, स्वातंत्र्य चळवळीचे प्रतिनिधीत्व करणारे पुण्यातील सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचे नेते केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर हे पुणे येथे ' जेधे मॅन्शन' मध्ये येऊन त्यांनी सत्यशोधकी ब्राह्मणेतर परंपरेला आपलेसे केले होते. त्यानंतरच खऱ्या अर्थाने बहुजन समाजाने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीलासुध्दा गती दिली होती.

**केशवराव जेधे**

महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे अत्यंत महत्त्वाचे नेते म्हणून केशवराव जेधे यांना ओळखले जाते. महात्मा जोतीराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून प्रेरणा घेतलेल्या तरुणांनी इ.स. १९१७ नंतरच्या काळात तेव्हाच्या पुण्यातील व महाराष्ट्रातील प्रस्थापित नेतृत्त्वाला जबरदस्त आव्हान दिले होते. लोकमान्य टिळकांसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या नेत्याला त्यांच्याच कर्मभूमीत टक्कर देणे, हे तसे सोपे नव्हते.[१] केशवराव जेधे यांच्यावर सत्यशोधक समाजाचा प्रभाव होता व याच प्रभावातून ब्राह्मणेतर चळवळ महाराष्ट्रात विकसित होत होती. पुणे येथे 'जेधे मॅन्शन' हे ब्राह्मणेतर चळवळीचे केंद्र बनले होते. केशवराव जेधे यांचे नाव वृत्तपत्रात सारखे झळकू लागले, ते पुण्यातील श्री शिवस्मारकाबाबतच्या वादामुळे![२] या दरम्यान 'तरुण मराठा मंडळा'ची स्थापना करून जेधे बंधु, पालकर बंधु, दिनकरराव जवळकर, विठ्ठलराव झेंडे वैगरेंनी ग्वाल्हेरचे राजे अलिजाबहादूर माधवराव शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालच्या शिवस्मारक समिती विरुद्ध बंड पुकारले होते.[३] तरूण मराठा मंडळाने इ.स. १९२२ सालच्या गणेश उत्सवात काढलेल्या 'छत्रपती मेळ्याने' खळबळ उडवून दिली होती. तो पर्यंत गणेशोत्सवातील मेळ्यातून टिळकपक्षाची स्तूती करणारी व सुधारक, नेमस्त पुढारी आणि स्त्रिया यांची टवाळी करणारी पदे म्हटली जात असत.[४] या मेळ्यातून पुढील पदे म्हटली जात असत :

''अहो सुधारक नव्हे। पण असती वेडझवे।
यांचे कळेनात कावे । मारा यांना पैजार।''
किंवा
''पोलक्यांनी पोरी सजल्या। शाळेचीच घाई''
किंवा
बिस्कुटे उष्टी त्वा खावी। साहेबी लक्तरे ल्यावी।

---

१. फडके य. दि., (१९८२), 'केशवराव जेधे', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ.क्र .५.
२. फडके य.दि., (१९८२), कित्ता, पृ.क्र.२७.
३. फडके य.दि. (संपा), (१९८४), 'दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय', महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणे, प्रस्तावना, पृ.क्र.५.
४. फडके य.दि. (१९७७), 'व्यक्ती आणि विचार', श्रीविद्या प्रकाशन पुणे, पृ.क्र.६८.



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

Scanned with CamScanner